# श्रीदासराम पंचविशी

## ओवी पहिली

**पाहता हे काय दोन । मुळी एकत्वची अभिन्न ।**
**शरीरे जाहली आन । परी जे परिपूर्ण ते पूर्णची ।।१।।**

**अर्थ :-** आपणास या जगातील ज्ञान द्वैताच्या आधाराने होते. मी एक देह असून माझ्या सभोवतालीही माझ्याप्रमाणेच देहधारी मानव आहेत. असे जरी

असले तरी भिन्नपणाने भासणाऱ्या ह्या सर्व देहांमध्ये एकच तत्त्व असून, ते एकमेव आणि सर्वार्थाने परिपूर्ण आहे. वेगवेगळ्या दिसणाऱ्या शरीरात एकच चैतन्यतत्त्व पूर्णपणाने व्यापले आहे.

**विवरण :- १)** व्यवहारामध्ये आपल्याला स्वतःच्या शरीराचा "मी" असा अनुभव येतो. तसेच भोवताली वावरणाऱ्या मानवी देहांना तू, ती असे संबोधून व्यवहाराची सोय केली जाते. जन्मलेल्या देहाचे बारसे करुन ठेवलेल्या नामाशी प्रत्येकाची तद्रूपता झाल्यामुळे एकमेकापासून देहाच्या रुपाने असलेले वेगळेपण अधिकच दृढ झालेले आहे. परंतु असे असले तरी सर्वांच्या सजीव शरीरामध्ये खेळणारे चैतन्यमात्र एकच असते. प्रत्येक देहानुसार चैतन्यामध्ये वेगळेपण, भेद असत नाही.

**२)** माणूस या विश्वाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. मानवी देहात तसेच ह्या विश्वात असणारे चैतन्याचे स्वरुप हे परिपूर्ण व अखंड असे आहे. परंतु आपल्यापेक्षा समोरचा माणूस वेगळा आहे असे गृहीत धरुनच आपण सगळे व्यवहार करतो. याचे कारण म्हणजे प्रत्येकजण स्वतःला द्रष्टा व समोरचा माणूस म्हणजे दृश्य असे विभाजन करुन वेगळेपणाने पहात असतो. असे पाहिल्याशिवाय आपण जीवनातील ज्ञानव्यवहार करु शकत नाही. असे विभाजन करुन, भेद करुन, दोहोमधील समान असणाऱ्या चेतनस्वरुपाला आपण खंडित करतो.

**३)** सर्व मानवी शरीरांची रचना समान असते. सर्वांमध्ये ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, अंतःकरण ह्या सर्व गोष्टी सारख्याच असतात. देहतादात्म्यामुळे जे अनुभवाचे केंद्र तयार होते त्याला 'अहंकार' असे म्हणतात. हा अहंकारच माणसाला एका देहापासून दुसरा वेगळा असल्याची जाणीव निर्माण करतो. पुढेपुढे तर विभाजन करुन एकीकडे 'मी' आणि दुसरीकडे दुसऱ्या व्यक्ती, दुसऱ्या वस्तू अशी विभागणी करुनच सारे व्यवहार घडतात. मी व तू ह्या दोनपणाच्या जाणीवेतूनच
अन्यपणाची, द्वैताची जाणीव जन्माला येते. पूर्णत्व फक्त चैतन्यस्वरुपात आहे. आणि चैतन्याचा साक्षात्कार झाल्याशिवाय द्वैताचे बंधन तुटत नाही. असा चैतन्याचा साक्षात्कार झाल्यानंतरच अभेदपणाने आणि पूर्णत्वाने सगळीकडे चैतन्यच व्याप्त असल्याचा अनुभव येतो.

## ओवी दुसरी

**पंचतत्त्वांचे शरीर । आत प्राणाचा निर्धार ।**
**गुरुकृपेचा विचार । वेगळाची असे ।।२।।**

**अर्थ :-** मानवी शरीर हे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ह्या पंचमहाभूतापासून बनलेले आहे. परंतु ही पंचमहाभूते जड आहेत. या जड देहात 'प्राण' आहे म्हणून हे शरीर जिवंत राहते. हा प्राण म्हणजेच चैतन्य होय. जड शरीरात असलेल्या चैतन्याचे ज्ञान गुरुकृपेशिवाय होणे शक्य नाही.

**विवरण :- १)** परमार्थात ज्या प्राणाला महत्व आहे तो प्राण सहस्रदलस्थानात असतो. हा प्राण चैतन्यरुप असून चैतन्य हे वायूरुप आहे. "प्राण एव आत्मा" असे श्रुतीवचन आहे. वायुचैतन्यरुप असलेल्या या मुख्य प्राणापेक्षा प्रिय वस्तु जगात नाही. हा मुख्य प्राण आणि श्वासोश्वासामधील प्राणवायू ह्यात फार मोठा फरक आहे. या मुख्य/प्रधान प्राणाच्या हाताखाली प्राण, अपान, उदान, व्यान आणि समान हे सूक्ष्मदेहातील पाच प्राण आपापले कार्य करीत असतात.



**२)** पंचमहाभूतामुळे शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध हे पाच विषय निर्माण झाले. या पाच विषयांमध्ये मन आसक्त बनून बंधनात अडकते. आतमध्ये जे चैतन्य आहे त्यामुळे आपण बाह्यविषयापासून मिळणारे सुख भोगू शकतो,याचाच जीवाला विसर पडतो. अशा वेळी पूर्वजन्मीचे संचित असेल तरच माणसाला विषयभोगाचा त्याग करुन चैतन्याचा शोध घेण्याची बुद्धि होते. अशा तऱ्हेने तीव्र मुमूक्षत्व प्राप्त झाले तरच सद्‌गुरुंची गाठ पडते. अशा शरणागत बुद्धि झालेल्या जीवावर सद्‌गुरु कृपा करतात. पुढे सद्‌गुरुंचा अनुग्रह झालेला साधक साधनाद्वारे परमार्थाच्या पुढील मार्गात प्रविष्ट होतो.

**३)** माणसाचा स्थूल देह हा पंचमहाभूतांच्या मिश्रणाने बनलेला असून तो डोळ्यांना दिसणारा आहे. ह्या पंचमहाभूतांचे प्रत्येकी पाच गुण/धर्म आहेत. अशा या स्थूल व जड देहामध्ये मुख्य प्राण/चैतन्य उपस्थित आहे. या मुख्य प्राणामुळे सचेतन असलेल्या देहाचे अंतरंग जाणीवमय आहे. परंतु देहबुद्धीने विकारवश झालेल्या जीवाला आपल्यामध्ये स्थित असलेल्या चैतन्याचे विस्मरण होते. उलट विषय भोगत रहाणे हेच आपले ऐहिक जीवित कार्य आहे असे समजण्याची दुर्बुद्धी तो हट्टाने धरुन ठेवतो. कधीकाळी सुदैवाने प्राप्त परिस्थितीविषयी असंतोष उत्पन्न होऊन ईशचिंतन करुन मोक्षाची प्राप्ती करुन घ्यावी अशा इच्छेने प्रयत्न करू लागतो. परंतु स्वसामर्थ्याने, स्वतःच्या प्रयत्नाने विषयवृत्तीचा त्याग करू शकत नाही. अशावेळी केवळ पूर्वसंचितानेच त्याची सद्‌गुरुंशी गाठ पडते. केवळ सद्‌गुरुंची गांठ पडण्यातच त्यांच्या कृपेच्या अविष्काराला सुरुवात होते. सद्‌गुरुकृपेवाचून परमार्थाच्या प्रदेशात प्रवेशच होऊ शकत नाही.

## ओवी तिसरी

**प्राण गेलिया शरीर । काय करील व्यवहार ।**
**चैतन्याचा साक्षात्कार । जेथे तेथे ।।३।।**

**अर्थ :–** या देहाचा स्वामी असलेला प्राणच आत्मा होय. मानवी देहाच्या सर्व क्रिया, चलनवलन या आत्म्याच्या सत्तेनेच होते. देहात प्राण आहे तोपर्यंतच देहाला किंमत आहे. प्राण गेलेले जड शरीर आपणहून कोणतेही व्यवहार करणेस असमर्थ असते. चैतन्याचा साक्षात्कार होऊनच देह जन्माला येतो. मानवी देहाचा जन्म चैतन्याच्या अधिष्ठानावर झालेला आहे. शरीराच्या हालचालीतील जिवंतपणाचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजेच खरा साक्षात्कार होय. हा साक्षात्कार सतत होत असतो.

**विवरण :– १)** चैतन्य हे वायुस्वरुप आहे. जड हे घनरुप आहे. अपल्या जड शरीरात जसे चैतन्य तसेच बाहेरील जड विश्वात देखील चैतन्य आहे. परंतु विश्वात असणारे चैतन्य जड नामरुपाच्या उपाधीमध्ये गुप्त रुपाने आहे. जगात पसरलेले जडनामरुपात्मक पदार्थ ही बाहेरील उपाधि आहे. विशिष्ट माणसाच्या दृष्टिने देह ही उपाधि आहे. देहामध्ये स्थित असलेल्या चैतन्याचा 'देह' या उपाधीचा विचार महत्वाचा ठरतो. लोहचुंबकाच्या कक्षेमध्ये लोखंडाचे खिळे येताच त्यांच्यामध्ये हालचाल सुरू होते. त्याचप्रमाणे चैतन्याच्या कक्षेत जड देह आला असता जड देहामध्ये हालचाल होण्यास सुरुवात होते. जड देहाचे चलनवलन होते. जडाला स्वतंत्र अस्तित्व नसले तरी जडाशिवाय चैतन्याचे स्वतंत्र अस्तित्व दाखविता येत नाही. म्हणून परमार्थामध्ये जड देहाला देखील अत्यंत महत्त्व आहे. देहाशिवाय चैतन्याचा साक्षात्कार होत नाही.

**२)** देहामध्ये आत्म्याचा साक्षात्कार कायमचा असूनही आपण मात्र त्याच्याजवळ नसल्याने आपणास त्याची प्रचीति येत नाही. परंतु बाहेरील दृश्याचा मात्र आपणास जडात्मक अनुभव येतो. याचे कारण शरीर जड आहे तसेच बाहेर पसरलेले नामरुपात्मक विश्वही जड आहे. जडाला जडाचे आकर्षण असते. म्हणून शरीराचा जड विश्वाशी व्यवहार घडतो. परंतु बाहेर पसरलेल्या जड जगताच्या उपाधीमध्ये स्थित असलेल्या चैतन्याचा अनुभव मात्र येत नाही. जेंव्हा शरीरामध्ये असलेल्या चैतन्याचा साक्षात्कार होईल



तेंव्हाच बाहेरील दृश्याचा केवळ जडात्मक अनुभव न येता त्या जड उपाधीमध्ये पसरलेल्या व्यापक चैतन्याचा अनुभव येऊ लागेल. बाहेरील जड दृश्यापासून सुख प्राप्त करून घेण्याची क्षमता जीवामध्ये आहे. ज्या देहाच्या सहाय्याने बाह्यसुख प्राप्त होते त्या देहामध्ये असलेल्या चैतन्यामुळे ही क्षमता प्राप्त झालेली आहे हे मात्र जीव विसरतो.

## ओवी चौथी

**चैतन्याच्या लहरी पूर्ण । जडत्वाचिया अपूर्ण ।**
**पूर्णा मेंळविता पूर्णापूर्ण । तरी ते पूर्णची सर्वदा ।।४।।**

**अर्थ :–** ब्रह्म हे 'सच्चिदानंद' स्वरुप आहे. ते केवळ सत् असते तर विश्व निर्माण झाले नसते. ब्रह्मातील चित् म्हणजेच चैतन्यामुळेच विश्वाची उभारणी होते. चैतन्यामुळेच जड बनले आहे. जडाला स्वतंत्र अस्तित्व नाही. चैतन्यातूनच जडाची उत्पत्ति होते. निश्चळ ब्रह्मावर चैतन्याच्या लहरी उठतात. चित् हे चंचळ आहे. ब्रह्म हे निश्चळ आहे म्हणजेच ते परिपूर्ण आहे. त्यामुळे त्यापासून निघालेल्या चैतन्याच्या लहरींची अवस्था सुद्धा पूर्ण असते. दृश्य विश्व म्हणजे अदृश्य चैतन्यावर उठणारी लहर आहे. हे म्हणजे संथ पाण्यावर लाट उठावी तसे आहे. लाट नाहीशी झाली तरी संथ पाणी जसेच्या तसे असते. तसे चैतन्यातून निघालेले जड विश्व नाशवंत आहे. त्यामुळे जड विश्वामध्ये उठणारी चैतन्याची लाट देखील अपूर्ण भासते. जड विश्व नष्ट होते म्हणूनच त्याचे अधिष्ठान असलेल्या चैतन्याच्या लहरीना अपूर्ण म्हणायचे. वास्तविक पाहता जडाच्या गुणधर्माच्या अपेक्षेमुळे जडाच्या लहरी अपूर्ण भासतात. परंतु नित्य संबंधाने पाहता जडातील अपूर्ण लहरी ह्या पूर्ण चैतन्याच्याच अविष्कार आहेत. पूर्णामध्ये कांही मिसळले अथवा वजा केले तरी अधिक कमी न होता पूर्ण ते पूर्णच रहाते.

**विवरण :– १)** "निश्चळाच्या अंगावरती । उठती चंचळाच्या लहरी" याचा अर्थ निश्चळ ते ब्रह्म व दृश्य ते चंचळ होय. ब्रह्म हे निश्चळ म्हणजे

सर्वस्वी निश्चळ नसून त्यात चंचळत्व आहे. पण ते फार सुक्ष्म आहे. ब्रह्मात असे किंचित चलत्व आहे म्हणूनच ब्रह्मावर चंचळाच्या लहरी उठू शकतात. ब्रह्मातले हे सुक्ष्म चंचळत्व आहे याचे कारण म्हणजे सत् म्हणजे अस्तित्वातच गती आहे. सत् हे लहरीयुक्त आहे. जेंव्हा लहरींनीयुक्त अस्तित्वाचा प्रवाह बनतो त्याला चैतन्य म्हणतात. प्रवाही अस्तित्व म्हणजेच चैतन्य होय. सत् ची हालचाल म्हणजेच चैतन्य होय.

**२)** पूर्णपणा हा चैतन्याचा स्वभाव आहे. त्यामुळे मिळणारे सुख, ज्ञान व समाधान हे पूर्णत्वाने असते. उलट अपूर्णपणा हा जीवाचा स्वभाव आहे. अपूर्णत्व हेच जीवाचे स्वरुप आहे. त्यामुळेच जीवाला अज्ञान, दुःख, असमाधान प्राप्त होते.

## ओवी पाचवी

**जेथे नाही कमी अधिक । कदापी नव्हे वेगळीक ।**
**वस्तू चोजविली चोख । जेथे आगळिक विश्वासी ।।५।।**

**अर्थ :-** वस्तू म्हणजे आत्मवस्तू होय. आत्मवस्तू ही अत्यंत शुध्द असते. आत्मवस्तू म्हणजे चैतन्य होय. ही आत्मवस्तू परिपूर्ण असून अखंडपणे अस्तित्वात आहे. आत्मवस्तू व्यापक असून ती सगळीकडे भरलेली आहे. ती नाही अशी जागाच नाही. परंतु बाहेरील विश्वाच्या बाह्यांगाचा अनुभव मात्र आपणास जडरुपाने, खंडीत, अपूर्ण आणि निराळेपणाने येतो. सुक्ष्म विचारांनी पाहिले असता बाह्यांगाने अशुद्ध दिसत असलेल्या विश्वाचे अधिष्ठान मात्र चैतन्य असून ते अत्यंत शुद्ध आहे. हे चैतन्य म्हणजेच चित् सत् म्हणजेच अस्तित्वस्वरुपापेक्षा वेगळे नाही. अशा शुद्ध सत्स्वरुप चैतन्याचा साक्षात्कार होण्यास नामरुपात्मक जडाचा अडसर दूर करणे आवश्यक आहे.

**विवरण :- १)** चैतन्याचा विलास म्हणजे हे विश्व हे जरी खरे असले



तरी चैतन्य आणि अखिल चराचर जगत् ह्यांच्यात महत्वपूर्ण फरक आहे. नानाप्रकारच्या मिश्रणातून निसर्गात पदार्थ तयार होतात. हे सर्व पदार्थ ज्या चैतन्यामुळे तयार होतात. ते चैतन्य जरी शाश्वत असले तरी मिश्रणे मात्र शाश्वत नसतात. विश्वात असणाऱ्या दृश्य वस्तुना कांहीतरी नाम आहे आणि विशिष्ठ रुप आहे. जगातील सर्व पदार्थांना आकार आहेत आणि म्हणूनच त्याना विकार ही आहेत. ह्या सर्व पदार्थांना रुपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर आहे. परंतु ह्या सर्व गोष्टीना अधिष्ठान असणारे चैतन्य मात्र विकृत होत नाही. त्याच्यामध्ये कमी अधिक असा कोणताही फरक होत नाही. ते जसेच्या तसे असते. ते अखंडत्वाने, नित्य व सर्वव्यापक असल्याने परिपूर्ण असे आहे. चैतन्याचे अस्तित्व हे त्रिकालाने बाधित न होणारे आहे. स्वतः चैतन्य त्रिकालाबाधित नसूनही विश्वाला मात्र त्याने कालचक्राने बांधले आहे आणि परमात्म्याचे हे कालचक्र जरासुद्धा मागे पुढे होत नाही. हा मात्र कौतुकाचा आणि आश्चर्याचा विषय आहे.

**२)** चोख म्हणजे शुद्ध. शुद्धता म्हणजे निर्मळतेची, पावित्र्याची परमोच्च श्रेणी होय. शुद्ध या शब्दात अभेद, निष्कलंकता, निर्मळता, पूर्णस्वरुपतेचा बोध होतो. अग्नि शुद्ध आहे असे आपण म्हणतो याचे कारण स्वतः शिवाय तो दुसरे काही अस्तित्वात ठेवत नाही. त्याचप्रमाणे आत्मवस्तु म्हणजेच चैतन्य हे सर्वांगाने पूर्ण, निर्मळ, निष्कलंक आहे असा अर्थबोध चोख म्हणजेच शुद्ध या शब्दाने व्यक्त होतो.

## ओवी सहावी

**अलक्ष्याचे जाले लक्ष्य । तोची प्रत्यगात्मा प्रत्यक्ष ।**
**व्यवहारी असावे दक्ष । साक्ष नारायणा ठेवोनी ।।६।।**

**अर्थ :-** आत्मतत्त्वाचे ठिकाणी जो कोणी लक्ष्य लावतो तो आपल्या ठिकाणी पूर्णत्वाने आत्मतत्वाचे दर्शन घेण्यास अधिकारी होतो. असे

आत्मदर्शन झाल्यानंतर व्यवहारातील प्रत्येक क्रिया, प्रत्येक उद्योग करताना 'त्या' नारायणाला म्हणजेच आत्मतत्त्वाला साक्ष ठेवून करावा. प्रपंचातील व्यवहार करताना तो आपल्या परमार्थाच्या आड येणार नाही याची काळजी घ्यावी.

**विवरण :– १)** ज्याला देवदर्शन झाले त्याला दुसरीकडे पहाण्याची इच्छाही होणार नाही. ज्याने देवाला पाहिले तो सतत देवालाच पहात राहील. परमेश्वर प्राप्ति झाल्यावर त्याला साजेसे वागणे हेच भक्ताचे कर्तव्य ठरते. संसारातच अलिप्त राहून परमार्थ करावा. व्यवहारात नानाप्रकारचे चलनवलन, उद्योग चालू असतात. व्यवहार करताना आपल्याला सदैव 'मी' चे स्मरण असते. आत्म्याचे स्मरण ठेवून ह्या सर्व क्रिया घडत नाहीत. व्यवहारात आत्म्याचे स्मरण ठेवून सर्व क्रिया कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत आत्मदेवाला सोडू नये. सर्व काही विसरले तरी चालेल परंतु हृदयस्थ नारायणाला विसरू नये. कधी कधी प्रपंचामध्ये शोकाचे तसेच मोहाचे प्रसंग येतात. अशावेळी असा प्रसंग हा देवाने घेतलेली आपली परीक्षा आहे असा विचार करुन विवेकाने वागावे. देवाच्या चरणी संसार समर्पण करुन मग जे प्रारब्धाने होईल तीच भगवंताची इच्छा समजून समाधानाने रहावे. परमार्थात जीव रंगला आहे अशी देवाची खात्री झाल्यावर तो त्याला व्यवहारातून आपोआप सोडवितो.

**२)** माणसाचे मन जेथे पोहोचू शकत नाही ते 'अलक्ष्य' होय. कूटस्थ, शुद्ध आणि अद्वैत असे ब्रह्म म्हणजेच "प्रत्यगात्मा" होय. अशा अलक्ष्य ब्रह्मस्वरुपाकडे लक्ष्य लावण्याचा अभ्यास म्हणजेच स्वरुपाकार होण्याचा अभ्यास होय. जेंव्हा सद्‌गुरुकृपेने माणसाचा सुक्ष्म अहंकारही नाहीसा होतो तेंव्हा त्याला प्रत्यगात्म्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो. दृढ अभ्यासाने स्वरुपाशी तदाकार होऊन राहता आले की तादात्म्याने साधक स्वरुपाकारच/ब्रह्माकारच बनून जातो.



## ओवी सातवी

**प्रेमालागी कार्यकारण । सापेक्ष जे करी बंधन ।**
**भक्तिसुख अप्रमाण । निरपेक्ष सत्यची ।।७।।**

**अर्थ :–** व्यवहारिक जगातले प्रेम हे कार्यकारण संबंधाच्या संदर्भातच मोजले जाते. दुसऱ्याकडून आपल्याला प्रेम मिळावे या परतफेडीच्या अपेक्षेने केलेले प्रेम हे सापेक्ष प्रेम होय. अशा सापेक्ष प्रेमाची परिणीती तो जीव दुःखाच्या बंधनात अडकण्यात होतो. याउलट भक्तिमध्ये मिळणारे सुख हे निरपेक्ष स्वरुपाचे असते. अशा निरपेक्ष मिळणाऱ्या आनंदाची यथार्थता सिद्ध करण्यास कोणत्याही अन्य प्रमाणांची आवश्यकता नसते. अशा निरपेक्ष भक्तितून मिळणारे सुख हेच केवळ खरे सुख असून तेच "सर्वसुख" होय.

**विवरण :– १)** व्यवहारातील सुख प्राप्त करुन घेण्यास बाहेरील जड दृश्य पदार्थांची आवश्यकता असते. माणसाला अखंड सुखाची लालसा असते. त्याला कायमस्वरुपी सुख हवे असते. पण तसे अपेक्षित सुख बाह्य जगापासून प्राप्त होत नसल्याचा अनुभव दिसून येतो. याचे कारण ज्या बाह्य जगाकडून आपण कायमच्या सुखाची अपेक्षा करतो ते जग कायमस्वरुपाचे नसून ते सतत बदलणारे आहे. जगाचे सतत स्थित्यंतर, अवस्थांतर व रुपांतर होत असते. बदलणाऱ्या जगापासून मिळणारे सुखही बदलणाऱ्या स्वरुपाचे असते. ते कायमस्वरुपाचे असत नाही. बाह्य वस्तू परस्वाधीन आहेत. त्यामुळे त्यावर अवलंबून असणारे सुख ही सापेक्ष असते तसेच ते कार्यकारण संबंधावर अवलंबून असते. कार्यकारणभावामध्ये घडणाऱ्या प्रत्येक कार्यामागे कोणते तरी कारण असतेच. कारणाशिवाय कोणतेही कार्य घडत नाही. व्यवहारात प्रेम केले जाते याचे कारण दुसऱ्याकडूनही त्याला सुख मिळावे हाच हेतू असतो. स्वतःच्या इच्छापूर्तीच्या कारणास्तवच दुसऱ्यावर प्रेम केले जाते.

**२)** आत्मा हा ज्याप्रमाणे चैतन्यरुप आहे तसाच तो आनंदरुप, सुखरुप आहे. तो प्रेमस्वरुप आहे. चैतन्यामुळे प्रेम आहे. प्रेमामुळे आकर्षण, खेच आहे. आज आपली खेच/आकर्षण शरीराकडे आहे. तीच खेच चैतन्याकडे गेली तर चैतन्याचेच अखंड आकर्षण निर्माण होईल. चैतन्याकडे अखंड आकर्षण म्हणजेच 'प्रेम' होय. आपली वृत्ती चैतन्याकडे वळविणे म्हणजेच भक्ती होय. भक्तिमधील सुखच यथार्थ म्हणजेच सत्यस्वरुपाचे आहे. बाह्य विश्वातील पदार्थाची यथार्थता म्हणजेच सत्यता सिद्ध करण्यासाठी 'प्रमाण' लागते. परंतु सुखरुप आत्मा हा बाहेरील अन्य विषयाप्रमाणे नाही. त्यामुळे त्याच्या सिद्धतेसाठी अन्य बाहेरील कोणत्याही प्रमाणाची आवश्यकता नाही. कारण हा आनंदरुप आत्मा इंद्रियातीत आहे. त्यामुळे तो स्वंयसिद्ध आहे.

**३)** यथार्थतेचा किंवा सत्यतेचा दुसरा निकष म्हणजे एखादा अनुभव जेंव्हा दुसऱ्या एखाद्या अनुभवाने बाधित होतो तो अनुभव असत्य होय. परंतु सुखरुप, आनंदरुप चैतन्याचा साक्षात्कार झाल्यानंतर मिळणारा आनंद अबाधित स्वरुपाचा असतो. सुखरुपतेच्या अनुभवाला अन्य अनुभवाद्वारे बाधा येत नाही. त्यानंतर त्या सुखाचा बाध होऊन दुःख निर्माण होत नाही. व्यवहारातील सुख मात्र अनेक बाह्य घटकानी बाधित होणारे असते.

## ओवी आठवी

**जव घडे देणे घेणे । तवची प्रेमसुख दुणे ।**
**पाहता जे अधिक उणे । समाधान दुःखद ते ।।८।।**

**अर्थ :-** व्यवहारातील प्रेम हे स्वार्थावर आधारलेले असते. व्यवहार म्हणजे देणेघेणे होय. जोपर्यंत आपले हितसंबंध जपले जातात तोवर प्रेमाची भरती असते. परंतु जेंव्हा आपल्या हितसंबंधाना बाधा येते तेंव्हा त्याच प्रेमाला ओहोटी लागते. अशाप्रकारे व्यवहारात मिळणाऱ्या समाधानाची दुसरी बाजू दुःखाची असते. त्यामुळे व्यवहारात मिळणारे सुख हे खरे सुख नसून सुखाचा



आभास आहे.

**विवरण :- १)** लौकिक प्रेम हे सापेक्ष स्वरुपाचे असते. ते देण्याघेण्यावर अवलंबून असते. आपल्या मुलावर आपण प्रेम करतो पण तोच मुलगा जर आपला द्वेष करु लागला, आपल्या जीवावर उठला तर त्याच्या विषयीचे आपले प्रेम उडून जाते. व्यवहारातले प्रेम भावनेवर अवलंबून असते. आपल्या भावना परिस्थितीनुरूप बदलत असतात. भावना बदलल्या असता प्रेम ही कमी अधिक होते. आपले संसारातले प्रेम दुतर्फी असते. ते सहेतुक असते.

**२)** बाह्य जगाकडून मिळणारे सुख हे दुःख मिश्रित असते. इच्छित वस्तू प्राप्त झाली की त्यापासून मिळणारे सुख ही संपते. बरे जगातील अमूक एक पदार्थ दुःखदायक व अमूक एक पदार्थ सुखदायक असे प्रत्येकवेळी आपण निश्चतपणे म्हणू शकत नाही. एका माणसाला ज्या पदार्थापासून सुख होते त्याच पदार्थापासून दुसऱ्या माणसाला दुःख होताना आपण पाहतो. म्हणजेच भिन्न भिन्न परिस्थितीत भिन्न पदार्थ सुखदायक वा दुःखदायक ठरतात. तसेच बाह्य जगातील सुख देणारे विषय मर्यादित असून त्यांचा भोग घेण्याची आपली शक्तिही मर्यादित असते. एकूणच व्यवहारातील सुख हे तत्कालीन आणि परस्वाधीन आहे. ते निर्भेळ नाही, शुद्ध नाही. कारण जवळ जवळ प्रत्येक सुखाला दुःखाची झालर आहे. म्हणजेच 'सुख' नावाचा स्वतंत्र पदार्थ नसून केवळ दुःखाचा अभाव असण्याची स्थिती म्हणजे सुख म्हणता येईल. म्हणून संसारात सुख नाही आणि संसार सुखाचा नाही हे कळण्यामध्येच खरे सुख आहे.

**३)** बाह्य परिस्थितीवर जर आपण आपले समाधान अवलंबून ठेवले तर आपल्याला कधीच खरे समाधान मिळणार नाही. व्यवहारातले, प्रेम, सुख हे दोषपूर्ण आणि अपूर्ण आहे. चैतन्याच्या जाणीवेत मिळणारे सुख सततचे असून त्याच्यातच खरे समाधान आहे. सर्व पदार्थांची इच्छा ही सुखाकरिता

असते परंतु भक्तिसुखाची इच्छा मात्र अन्य कोणत्यही पदार्थाकरिता नसते. ती स्वयंसुखाकरिताच असते. अशा सुखामध्ये निरुपाधिक प्रेम अंतर्भुत असते. याउलट अन्य वस्तुविषयीचे प्रेम मात्र सोपाधिक असते.

## ओवी नववी

**चैतन्य चित्ताठायी विलसे । सकळ विश्वासी प्रकाशे ।**
**निवर्तता वृत्ती नासे । अखंड सुख ।।९।।**

**अर्थ :–** चित्ताच्या ठिकाणी जेंव्हा चैतन्य प्रकाशमान होते तेंव्हा तोच प्रकाश साधकाला संपूर्ण विश्वामध्ये पसरलेला दिसू लागतो. अशावेळी जडाकडे असलेली वृत्ती परत फिरून चैतन्याकडे लागते आणि साधकाला अखंड सुखाची प्राप्ति होते.

**विवरण :– १)** प्रायः आपण मन आणि चित्त हे शब्द समानार्थी स्वरुपात वापरतो. पण मन आणि चित्ताच्या स्वरुपात फरक आहे. चिंतन करणे हे चित्ताचे स्वरुप आहे. चित्त हे चैतन्याचा एक अंश आहे. एकाग्रतेने चैतन्याचे चिंतन केल्याने चित्त स्वतःच चैतन्यरुप होते आणि दिव्य प्रकाशाने भरून जाते. हा प्रकाश ज्ञानयुक्त असतो. चैतन्याची ही शोभा बाहेरही अनुभवास येऊ लागते. चैतन्याची प्रभा म्हणजे तेज चोहोकडे पसरते. चैतन्याचा विश्वरुप आविर्भाव म्हणजे त्याचा विलास आहे, चैतन्याचा खेळ आहे. चैतन्य अनेक रुपे घेऊन विश्वामध्ये साकार होते. ह्या चैतन्याच्या महासागरावरील तरंगाचे हे नृत्य सतत चालत असते पण त्यामुळे त्याच्या निश्चळ, निराकार मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

**२)** बाहेरचे जग मनावर आघात करते तेंव्हा ते संस्काररुपाने साठविले जाते. संस्कार साठविणाऱ्या साठ्यास चित्त असे म्हणतात. चित्त हे जिवंत गतिमान असते. जेंव्हा एखादी वस्तु, व्यक्ति व घटना समोर येते तेंव्हा चित्तामध्ये प्रतिक्रियारुप स्पंदन होते. ते आवडीचे अगर नावडीचे असते.



स्पदंनाच्या या आकारास वृत्ति म्हणतात. सुरवातीला जडाकडे जीवाची वृत्ति असते कारण प्रारंभाला जीव बहिर्मुख असतो. परंतु जीव अंतर्मुख झाल्यानंतर ही वृत्ति चैतन्याकडे वळते.

प्रत्येक माणसाच्या ठिकाणी श्वासाचे अनुकंपन चालूच असते. तेथे लक्ष किंवा दृष्टि लागली की वृत्ति तदाकार होते. या अवस्थेत मनात कोणतेही विचार येत नाहीत. अशा निर्विचार अवस्थेत स्थिरावल्यानंतर षड्विकार दूर होतात. अशी अवस्था झाली म्हणजे छंद लागतो. छंद लागणे म्हणजे त्याशिवाय दुसरे कांही न सुचणे. चैतन्याचा छंद लागणे म्हणजे अखंड त्याचे अनुसंधान लागणे होय. अशा तऱ्हेने जडाकडून माघारी वळलेली वृत्ति वृत्तिरुपाने रहात नाही. चैतन्य हे सर्वव्यापी आहे. व्यापल्या जाणाऱ्या वस्तूला जे संपूर्णपणे व्यापते ते सर्वव्यापी असते. त्यामुळे अशा सर्वव्यापक चैतन्याकडून मिळणारे सुख ही अखंड सुख असते.

## ओवी दहावी

**चैतन्याचा अविष्कार । होता सहज साक्षात्कार ।**
**जरी देह हे चत्वार । निरसती ।।१०।।**

**अर्थ :–** स्थूल, सुक्ष्म, कारण आणि महाकारण अशा चार देहांचा साधना/नेम करून निरास होतो तेंव्हाच देहामधील कणाकणामध्ये असणाऱ्या चैतन्याचा आविष्कार प्रकट होतो. अशा तऱ्हेने चैतन्याचा प्रकर्ष होतो तेंव्हा साधकाला साक्षात्कार होतो.

**विवरण :– १)** सत्च्या म्हणजे अस्तित्वाच्या स्फुरण पावण्याला चित् म्हणजेच चैतन्य असे म्हणतात. अस्तित्वरुपाने विश्वामध्ये चैतन्याचा महासागर पसरलेला आहे. अव्यक्त सत् स्वतःमधून व्यक्ताची म्हणजेच चैतन्याची सृष्टि निर्माण करते. अशा तऱ्हेने स्वतःचा आविष्कार करते. तो आविष्कार अचेतन व सचेतन अशा दोन्ही दृश्यरुपात प्रकटतो. चैतन्याचे स्फुरण जड

द्रव्यामध्ये अणुशक्तीच्या रुपाने प्रकटते. तर चेतन, वनस्पती आणि प्राण्यामध्ये प्राणशक्तीच्या रुपाने प्रत्ययाला येते. प्राणशक्तीचा अत्यंत उत्कट अविष्कार अगर व्यक्तपणा हा माणसामध्ये अनुभवास येतो. माणसामधील "जाणीव" हे त्याचे दृश्य रुप होय. ही प्राणशक्ती म्हणजेच चैतन्य होय. चैतन्याच्या साक्षात्कारासाठी त्याचे स्फुरण अन्नमय कोशापासून आरोहण करते. आरोहाणाच्या या प्रवासात पंचकोश आणि चार देहाच्या निरसनानंतर आत्म्याचे म्हणजेच चैतन्याचे दर्शन होते.

**२)** उपाधिभूत जीवनामध्ये पृथ्वी, आप, तेज आणि वायू अशी चार जड तत्वे आहेत. ही तत्त्वे चार देहामध्ये समाविष्ट असतात. स्थूल देह हा पृथ्वी आणि आप, सुक्ष्म देह तेज; कारण देह वायुरुप आणि महाकारण देह आकाशरुप आहे. या चारी देहांच्या निरसनानंतरच चैतन्याच्या आविष्काराची प्रचिती येण्यास सुरुवात होते. चैतन्याचा साक्षात्कार म्हणजे स्वतःला परमात्मस्वरुपाचे झालेले प्रत्यक्ष ज्ञान अगर प्रत्यक्ष दर्शन होय. साक्षात्कार होणे ही वेगळी अशी घटना नसून ती सहज होणारी प्रक्रिया आहे. "सह" म्हणजे बरोबर अगर संगतीने आणि "ज" म्हणजे जन्मलेले, स्वाभविक अगर नैसर्गिक. चत्वार देहाच्या निरसनानंतर चैतन्याच्या आविष्काराचा येणारा अनुभव म्हणजेच आत्मस्वरुपाचा प्रत्यक्ष अनुभव होय. यालाच "सहज" साक्षात्कार म्हणतात.

## ओवी अकरावी

**चित्त चैत्यनी चोरले । तेथे आत्म्याचे सोहळे ।**
**--- भिकेचे डोहळे । कैचे होती ।।११।।**

**अर्थ :-** जेंव्हा चित्ताला चैतन्याव्यतिरिक्त अन्य विषय चिंतनासाठी दिला जातो तेंव्हा त्याचा परिणाम म्हणजे तो जीव आत्मसुखापासून वंचित होतो.अशा जीवाला केवळ दुःखाची प्राप्ति होते.



**विवरण :- १)** मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार मिळून अंतःकरण चतुष्टय बनते. मन हे जड व चैतन्य असे दोन्ही मिळून बनले आहे. मनाच्या जडाच्या गुणधर्मामुळे ते बहिर्मुख बनते आणि संकल्पविकल्प करीत रहाते. मनाचे जडाऐवजी चैतन्याकडे आकर्षण होणे आवश्यक आहे. चित्त म्हणजे मनाचे मन होय. मनातील विषयांचे चिंतन करणे हा चित्ताचा स्वभाव आहे. मन हे नेहमी बाहेरील अनेक विषयांचे चिंतन करीत असते म्हणून चित्तही नेहमी बाहेरील जड विषयांच्या चिंतनातच रमलेले असते. परंतु जेंव्हा मनाचा विषय चैतन्य होतो तेंव्हा चित्तही नैसर्गिकपणे चैतन्याचेच चिंतन करीत राहील.

**२)** वृत् म्हणजे निवड करणे, पसंत करणे आणि या निवडीला येणारा आकार म्हणजे 'वृत्ति' होय. चित्त म्हणजे पुर्वीच्या अनुभवांचा साठा होय. संस्कारसाकल्याच्या या चक्राला आपण आपल्या निवडीने गति देत असतो. चित् म्हणजे चेतना अगर चैतन्य होय.त्यामुळे चित्ताचा खरा विषय 'चैतन्य' आहे कारण चित्त म्हणजे चैतन्याचा, चेतनेचा अंश होय. चित्ताचा खरा हक्काचा विषय चैतन्य आहे. परंतु या चित्ताच्या हक्काच्या विषयाची लुबाडणूक बाह्य विश्वातील विषय वृत्तिच्या निवडीमुळे होते. अशा तऱ्हेने जीवाकडून दुसऱ्याची म्हणजेच चैतन्याची चोरी करुन व्यवहारिक वृत्ति चित्ताच्या चिंतनाला दिली जाते. व्यवहारिक वृत्तिच्या चिंतनामुळे तोच विषय बुद्धी निश्चयाने स्विकारते. आणि तदनुसार कर्म घडत राहते. दुःखाला निमंत्रण देणारे बाह्य विषयाचे चिंतन म्हणजे भिकेचे डोहाळे होय. अशा विषयलोलूप जीवाला आत्मसुखाचा उत्सव, आत्मसुखाचा सोहळा प्राप्त होणार नाही.

## ओवी बारावी

**म्हणोनी ते वृत्तीच सरली । अलक्ष्य तेची कवटाळी ।**
**तादात्म्य होवोनी बाहुली । नेत्रीचिये ।।१२।।**

**अर्थ :–** आत्मस्वरुप अलक्ष्य असते. अलक्ष्याकडे लक्ष्य देणे म्हणजेच आपल्या मुळाकडे वृत्ति वळविणे होय. दृश्याकडून वृत्ति माघारी फिरणे ही अंतर्मुखतेची अवस्था होय. आपल्या मुळाकडे वृत्ति वळविणे म्हणजे अलक्ष्य आत्म्याशी तादात्म्य पावण्याची प्रक्रिया होय. अलक्ष्य आत्म्याशी आलिंगन म्हणजे नेत्राच्या पुतळीने पहाणेपणाशी तादात्म्य पावणे होय. आता नेत्राच्या बाहुलीला स्वतःचे वेगळे अस्तित्व रहात नाही. याप्रमाणेच निर्वृत्ती झाल्यावर वृत्तिचे वेगळे अस्तित्वच संपून जाते.

**विवरण :– १)** अंतःकरण चतुष्टयातील मन, बुद्धी आणि चित्त या तीन्ही बरोबर तादात्म्य पावून अहंकार वृत्ति काम करीत असते. ही अहंकार वृत्ति नेत्राद्वारे बाहेर पडून दृश्याचे ज्ञान करुन घेते. अशा तऱ्हेने दृश्याचा अनुभव घेतला जातो. हा अहंकार चंचळ दृश्यापासून परत फिरतो तेंव्हा शुद्ध मनाला चैतन्याशिवाय संकल्प करण्यास दुसरा विषय रहात नाही. आता चित्त फक्त चैतन्याचेच चिंतन करते. चिंतन करते म्हणण्यापेक्षा ते आपोआप होते. बुद्धीच्या ठिकाणी सुद्धा हीच भूमिका रहाते.

**२)** जोपर्यंत जीवभाव आहे तोपर्यंत 'मी' पणाला व्यापणारे 'लक्ष्य' कोणत्या ना कोणत्या स्वरुपात असतेच. तसेच तो आत्मा अलक्ष्य आत्मतत्वाच्या रुपाने असतो. आत्म्याच्या ठिकाणी साक्षिभूत चक्षु आहे. त्यास प्रज्ञाचक्षु म्हणतात. बाह्य दृश्यापासून परत वळलेली वृत्ति अत्यंत सूक्ष्म असते. अशी सूक्ष्म वृत्ति अलक्ष्य अशा प्रज्ञाचक्षुला लक्ष्य करते. आणि ही सूक्ष्म वृत्ति प्रज्ञाचक्षुशी तादात्म्य पावते. अशा तऱ्हेने सूक्ष्म वृत्तिचा विलय होतो. आता चंचळदृश्य दृष्टिपुढे रहात नाही. आणि केवळ प्रज्ञाचक्षुच विश्वरुप होऊन राहतो.

## ओवी तेरावी

**जरी का हा परिपाक । तेथे काय होय दुःख ।**
**द्वैत दाविजे सम्यक । अद्वय स्थिती ।।१३।।**



**अर्थ :–** जीवाला जगाचा अनुभव वृत्तिज्ञानाद्वारे होतो. वृत्तिज्ञानानंतरच अंतःकरण चतुष्टय कार्यरत होते आणि जीवाला सुखदुःखाचा अनुभव येतो. परंतु साक्षिभूत आत्म्याशी तादात्म्य पावल्यानंतर त्रिपुटीरुपाने असणारे द्वैत उरत नाही. अशा अद्वैत स्थितीतच निश्चळ आनंद प्राप्त होतो.

**विवरण :– १)** प्रज्ञाचक्षुच्या रुपाने चित्शक्तीच प्रकाशमान होते. चित्शक्ती प्रकाशरुप असते, आनंदरुप असते. 'चित्' शक्तीचा प्रकाश पडला की द्वैतभाव नाहीसा होतो. वृत्ति आत्माकार झाल्यावर द्वैत उरत नाही. देहबुद्धीतून उठणारी वृत्ति द्वैत निर्माण करते. जेथे द्वैत आहे तेथे भय आहे. जेथे भय आहे तेथे निर्भेळ सुख प्राप्त होणार नाही.

व्यवहारात वाचेच्या पलीकडे मन आहे. परंतु परमार्थात मनाच्या पलीकडे एक वाचा आहे. मनासह ही वाचा निवृत्त होणे म्हणजे खऱ्या अर्थाने मूकत्व येणे होय. हे मूकत्व म्हणजे आत्म्याचे बोलणे असते. हेच अबोलाचे बोलणे असते. ह्या अबोलाच्या बोलण्याच्या अवस्थेत आल्यानंतर अद्वैताची आणि निश्चळ आनंदाची प्राप्ती होते.

**२)** द्वैताचे माध्यम स्विकारल्याशिवाय अद्वैताचे स्पष्टीकरण करता येत नाही. आत्मसाक्षात्कारानंतर जगताविषयीचा पूर्वीचा सत्यत्वाचा निश्चय रहात नाही. त्याच्या सत्यत्वाचा निश्चय मागे पडून त्याच्या मिथ्यत्वाचा निश्चय ठसला जातो. जगाच्या मिथ्यत्वाचा जोवर निश्चय होत नाही तोवर द्वैत असते. आत्मसाक्षात्कारानंतर जगत् पूर्वीप्रमाणे दिसत राहिले तरी ते बाधित असते. आता जगत् कसे दिसेल? तो आता जगताचा अनुभव हा "चिद्विलासाचा" अनुभव असतो. "चिद्विलास" म्हणजे चैतन्याची शोभा, चैतन्याचा आनंद असतो. हा अद्वय स्थितीचा आनंद असतो. एकास सोडून दुसऱ्याचे अस्तित्व नसणे म्हणजे अद्वय. एकमेकाशिवाय प्रत्येकाचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व नसण्याची स्थिती म्हणजे अद्वय होय. इथे सत् म्हणजे अस्तित्व चिद्ने म्हणजे चैतन्याच्या प्रकाशाने शोभून दिसते. अशा तऱ्हेने सत् चा विलास चिद् असे दोन्ही मिळून एक अशी अद्वय स्थिती असते.

## ओवी चौदावी

**डोळा मिळालिया कान । सहजेची समाधान ।**
**सहस्रदळी धावे प्राण । निघोनिया सोहं पासून ।**
**उपाधिजीवन आकर्षे ।।१४।।**

**अर्थ :–** आत्मसाक्षात्कारासाठी सोहं–हंसाचे साधन आहे. जेंव्हा श्वसनगतीवर दृष्टि व श्रोत्र एकवटले जातात तेंव्हा जीवनाची ही गति सूक्ष्म बनते. उपाधिभूत जीवनाचे आकर्षण कमी होते. नेहमी दृश्यावर उठणारी वृत्ति श्वास आणि उच्छवासामधील आपोआप उमटणाऱ्या सोहं वरती उठू लागतो. नंतर हे सोहं ही मागे पडून शुद्ध झालेले आकाशरुप जीवन सहस्रदळाकडे धावणाऱ्या प्राणामध्ये मिसळत रहाते. त्यामुळे आनंदाचा, समाधानाचा स्वाभाविक आविष्कार होऊ लागतो.

**विवरण :– १)** सोहं लाच स्वानंदघन असा अजन्म आत्मा असे म्हटलेले आहे. तो शरीरामध्ये सहस्रदळी राहतो. सोहं आत्मा म्हणजेच परमात्मा हा हंसरुपाने नटलेला आहे. सोहं आत्म्यामुळेच आपणास बाहेरील विश्वाचे ज्ञान होते. सोऽहं हा शब्दच अवाड्.मय आहे. म्हणून सोहं चे ज्ञानही वाचा आणि मन यांच्या पलीकडे जाऊन संपादन करुन घ्यावे लागते. सोहं हंसाचे साधनच स्वानंदघन सोहं आत्म्यापर्यंत घेऊन जाणारे आहे. श्वासोच्छवास हे सोहंहंसाचे साधन आहे. असे असले तरी श्वासोच्छवासाची क्रिया मात्र ऐच्छिक नाही. ही क्रिया सोहं आत्म्याच्या इच्छेनेच होत असते.

**२)** एकांतामध्ये स्वस्थ चित्ताने बसून श्वासोच्वासावर लक्ष ठेवले असता श्वास आत घेताना 'सो' व बाहेर सोडताना 'हं' असा शब्द उमटतो. ही क्रिया लक्षपूर्वक आणि सावधपणे पाहिली असता सोहं चा नाद अगर उच्चार होत नसून सोहं सदृश सूक्ष्म शब्द उमटत असल्याचा अनुभव येतो. बाकी कशाचीही जाणीव न राहता फक्त सोहं ची जाणीव सतत राहणे म्हणजे साधन होय. श्वसनाच्या गतीवर डोळे व कान एकवटले जाऊन श्वसनाची गती सूक्ष्म होते. ज्या प्रमाणात श्वसनाची गती सूक्ष्म होईल त्या प्रमाणात मन ही स्थिर होते. अशाप्रकारे श्वासामधील सोहं ची जाणीव ही शिल्लक रहात नाही. अशा शुद्ध आकाशतत्त्वासह प्राण सहस्रदळी धावू लागतो. सहस्रदळस्थानामध्ये प्रकाश आणि नादरुपाने नटलेल्या स्वानंदघन सोहंहंसरुपी आत्म्याचा साक्षात्कार होतो. अशा प्रकारे झालेल्या साक्षात्कारानंतर जीवाला खरे समाधान प्राप्त होते.



## ओवी पंधरावी

**जीवनाचे बाष्पीभवन । होता आकाशी गमन ।**
**भ्रूमध्य पवित्र स्थान । आर्कषण तेथेची ।।१५।।**

**अर्थ :–** आत्म्याला आकाशाची उपमा दिली जाते. आत्मसाक्षात्कार होण्यासाठी आपले जीवन आकाशरुप होऊन सहस्रदळस्थानी जाणे गरजेचे आहे. साधनेच्या– योगे आकाशरुप झालेले जीवन उर्ध्वगामी होऊन भ्रूमध्यात प्राणगतीकडे आकर्षित होते आणि हळूहळू प्राणगतीशी एकरुप होऊ लागते.

**विवरण :– १)** जीवन म्हणजे श्वासोच्छवास. हे जीवन उर्ध्वगामी होण्यासाठी आधी श्वासोच्छवास स्थिर व्हावा लागतो. त्यासाठी श्वासोश्वासातील निःश्वास खाली येण्याचे प्रमाण कमी व्हावे लागते. सर्व साधारणपणे परिस्थितीनुरुप तसेच माणसामाणसामधील भिन्न स्वभावानुसार त्याचे बारा ते वीस अंगुळे इतके निःश्वास खाली येण्याचे प्रमाण असते. साधनेच्या अभ्यासाने बाह्य श्वसनाचा निरोध साधला जाऊन निःश्वास खाली येण्याचे प्रमाण कमी कमी होत जाते. जसे जसे हे प्रमाण कमी होईल त्या प्रमाणात श्वसनामध्ये सुक्ष्म रुपात असलेले, पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही तत्त्वे तसेच त्यांच्याशी निगडीत असलेले देह यांचे शुद्धीकरण होते. शेवटी ते जीवनापासून वेगळे होतात. म्हणजेच चत्वार देहांचा निरास होतो. अशा वेळी श्वास फक्त नाकातल्या नाकात वाहू लागतो. अशातऱ्हेने फक्त

आकाशरुप शुद्ध जीवन शिल्लक रहाते.

**२)** साधनेच्या योगाने उपाधिभूत जीवनावर चित्ताची एकाग्रता व दृष्टीची तादात्म्यता होते तेंव्हा हृदयामध्ये वायूची घर्षणक्रिया आपोआप सुरू होते. हृदयामध्ये वायूची घासणी सुरु झाली की ॐ काराचा वन्हि प्रकट होतो. त्या वन्हीच्या आचेने/उष्णतेने उपाधिभूत जीवनातील पृथ्वी, आप इत्यादी तत्त्वे बाजुला होतात. ॐकाराच्या वन्हीच्या आचेने जीवनाची वाफ होते व आता शिल्लक राहिलेले शुद्ध आकाशरुप जीवन भ्रूमध्यात येते. साक्षात्काराच्या दृष्टीने हे स्थान महत्वाचे आहे. शुद्ध आकाशरुप जीवनाला भ्रूमध्यात असलेल्या प्राणगतीचे आकर्षण निर्माण होते. शेवटी शुद्ध आकाशरुप जीवनगती व प्राणगती एकरुप होतात. आकाशतत्व हे व्यवहारिक सत्तेचे सार आहे. सार हे नेहमी सुक्ष्म आणि व्यापक असते. आत्मतत्त्व हे आकाशतत्त्वाहून सूक्ष्म आणि व्यापक आहे. अशा आत्म्याच्या साक्षात्काराच्या खुणा भ्रूमध्यात दिसू लागतात. त्यामुळे भ्रूमध्यस्थान हे अत्यंत महत्वाचे आणि पवित्र मानले गेले आहे.

## ओवी सोळावी

**करी जीवाशिवाची ऐक्यता । साधनी होताची एकता ।**
**असंगा संग केउता । घडेल पा ।।१६।।**

**अर्थ :-** भ्रूमध्यापर्यंत आलेला जीव सहस्रदळपर्यंतच्या प्रवासासाठी उत्सुक असतो. जीवाभोवती असलेल्या जड उपाधिंचा संपूर्णपणे संग सुटणे आवश्यक असते. असा जीव असंग अशा शिवाशी ऐक्य पावून समाधान मिळविण्याची इच्छा करीत असतो.

**विवरण :- १)** भ्रूमध्यापासून सहस्रदळापर्यंतचा प्रवास हा अत्यंत सुक्ष्म आहे. जीव हा प्रवास करतो असे म्हणण्यापेक्षा सद्गुरुकृपेने हा प्रवास आपोआप होतो असे म्हणणे योग्य होईल. उर्ध्वमुख झालेली शुद्ध आकाशरुप जीवन गती प्राणगतीशी मिळते तेंव्हा भ्रूमध्यात नाद उमटतो. ह्या ऐक्यातून उमटणारा नाद म्हणजेच नाम होय. हेच तात्विक नाम होय. ह्या नामाची गती व प्राणाची गती एकरुप होऊन उर्ध्वगामी होतात तेंव्हाच तिसरा डोळा, ज्ञानचक्षु उघडतो. हा डोळा माणसाच्या भ्रूमध्यात आहे. नामगती व प्राणगती ज्या अवस्थेत एक होतात त्या अवस्थेला येणे म्हणजे साधन साधणे होय. हीच साधनाची एकता होय.

**२)** जीव आणि शिव हे मूळ परमात्म्याला उपाधिअंती वापरण्यात येणारे शब्द आहेत. शरीराच्या जड उपाधीत सापडून अज्ञानाने जीव होतो तर साक्षी अशा चैतन्यरुपी ज्ञानाच्या उपाधित सापडून शिव होतो. जीव पिंडाशी म्हणजेच विशिष्ट शरीराशी संबंधित आहे तर शिव ब्रम्हांडाशी संबंधित आहे. जीवाचे लक्ष बाहेरील दृश्याकडे तर शिवाचे लक्ष चैतन्याकडे असते. हे दोघेही मानवी शरीरात सहस्रदलस्थानात असतात. परंतु ते समोरासमोर नाही तर एकमेकांकडे पाठ करून आहे. शिवाशी ऐक्यता पावण्यास जीवाने आपली बहिर्मुखता दूर करुन शिवाकडे पाहिले पाहिजे. अंतर्मुख झाले असता जीवाचा जड उपाधिशी असलेला संग सुटतो. आणि असंग झालेल्या जीवाची असंग असलेल्या शिवाशी ऐक्यता घडते.

## ओवी सतरावी

**असंगाचा संग दृष्टी । घडता प्राणासवे गाठी ।**
**दृश्यादृश्य द्वैत गोठी । सरता भेटी शून्यातू ।।१७।।**

**अर्थ :-** उर्ध्वमुख प्राणगतीची दृष्टि सहस्रदलस्थानाच्या प्रवासात शून्याला ओलांडते. तेथून पुढे प्राणगतीची गाठ सहस्रदलस्थानी शिवाशी पडते. प्राणगतीच्या धक्याने जीवाची दृष्टि असंग शिवाकडे वळते. अशा तऱ्हेने आत्मसाक्षात्काराचा अनुभव येतो. ह्या त्रिपुटीरहितच्या अद्वैत अनुभवाने दृश्यादृश्यात्मक द्वैत नाहीसे होते.

**विवरण :- १)** भ्रूमध्यस्थानी उर्ध्वमुख झालेली प्राणगती आता सहस्रदलस्थानाकडे वाहू लागते. हा प्राण वाटेत त्रिकूट, महाशून्यात्मक औटपीठ, भ्रमरगुंफा पार करून नंतर येणाऱ्या ब्रह्मरंध्र स्थानातून सहस्रदलस्थानात येतो. येथे तो जीवाला शिवरुप पहावयास लावतो. पुढे शिवरुप झालेला जीव परमात्मस्वरुपात मिसळून जातो.

**२)** जेवढे म्हणून दृश्य आहे ते सगळे बाजूस सारुनच जीवाचा भ्रूमध्यापासून उर्ध्वमुख प्रवास सुरु होतो. दृश्य बाजूस सरले असले तरी जीवाला अद्यापी औटपिठातील अदृश्य महाशून्य ओलांडूनच पुढे जावे लागते. शून्याचा प्रांत हा सुक्ष्माचा प्रांत आहे. जे अदृश्य सूक्ष्म वेगळेपणाने अनुभवता येते त्यास 'शून्य' म्हणतात. आत्मसाक्षात्काराच्या दर्शनामध्ये येणारे हे अदृश्य शून्य ओलांडावे लागते. शून्याच्या अनुभवामध्ये द्वैत आहे. परंतु शून्याकडे वेगळेपणाने न पाहता जीव जेंव्हा शिवाशी ऐक्य पावतो. तेंव्हा दृश्य ही नाही आणि द्वैतही नाही असा अनुभव येतो. हाच द्वैतभाव निरसणारा त्रिपुटीरहित अद्वैताचा अनुभव होय.

## ओवी अठरावी

**तेथे काही मेळविले । किंवा कांही उणे केले ।**
**तरी ते जैसे तैसे राहिले । निश्चळत्वे चांचल्ये ।।१८।।**

**अर्थ :-** निश्चय परब्रह्मातील चंचळ चिद्वायू म्हणजे आत्मा होय. म्हणजेच ह्या परब्रह्मातील निश्चळ तत्त्व ही वायु आहे आणि चंचळ तत्त्व ही वायुच आहे. चैतन्यरुप परब्रह्म पूर्णत्वाने नटलेले आहे. त्यामध्ये काही मिसळले किंवा ह्यातून काही उणे केले तरी त्याच्या स्वरुपात कांहीच बदल होत नाही.

**विवरण :- १)** परब्रह्म पूर्णरुपाने असते. पूर्णत्वाच्या ठिकाणी अखंडत्व असते. अखंडतेत सहजता असते. कोणत्याही गोष्टीमध्ये अखंडता येण्यास



त्यातील द्रव्य, क्रिया होण्यापूर्वी, क्रियारुपात आणि क्रियेनंतरही अखंडत्वाने एकच असावयास हवे. चैतन्यद्रव्यरुप परब्रह्म अखंड अनादि, अनंत आणि सर्वव्यापक असे आहे. त्याच्या ठिकाणी जो भेद निर्माण झालेला दिसतो तो वस्तुतः खरा नाही. विश्वामध्ये सतत चालू असणाऱ्या उत्पत्ति, विकास, ऱ्हास, क्रिया-प्रतिक्रिया हया गोष्टीमुळे ते सतत खंडित आणि बदलत्या रुपात प्रत्ययास येते. परंतु स्थित्यंतर, अवस्थांतर ह्यामुळे भेदत्वरुपाने अनुभवास येणाऱ्या हया सर्व घटनांच्या पाठीमागील प्रेरक शक्ती मात्र चैतन्य हेच असते. बिंदूला पूर्णत्व दिले तर त्याचे वर्तुळ होते. त्याप्रमाणे भेदास पूर्णत्व दिले तर अभेद स्थिती निर्माण होईल. अभेदस्थिती म्हणजेच निश्चळत्व होय. परब्रह्म हे निश्चळ आणि स्थिर आहे.

**२)** परब्रह्म ही एक संपूर्ण अखंड सत्‌वस्तु आहे. कोणत्याही सत्याचे विभाजन आपल्या समजुतीसाठी, सोईसाठी अनेक घटकात आपण करीत असतो. पण सत्य म्हणजे त्या घटकांची गोळाबेरीज ही कल्पना बरोबर ठरत नाही. बाहेरील विश्वाच्या स्वरुपामध्ये दिसणाऱ्या भेदामुळे परब्रह्मात काही मिसळले जाते व काही उणे केले जाते असे वाटते. परंतु प्रत्यक्षात ते तसे नाही. विश्वात जड आणि सचेतन अशा प्रकारच्या वस्तु आढळत असल्यातरी त्यामागील मूलभूत तत्त्व एकच एक चैतन्य आहे. हे चैतन्य सक्रिय आहे. त्यामुळेच त्यामध्ये निर्मिती-विनाश, जन्म-मृत्यू आणि परिवर्तन अशा परस्परविरोधी प्रक्रिया चालू असतात. विश्वामध्ये अशा सतत चालु असलेल्या घडामोडींमुळे भेद भासमान होतो. जेथे भेद आहे तेथे अखंडत्व आणि पूर्णत्व संभवत नाही. परंतु हा जाणवणारा भेद भ्रामक आहे. कारण हया विश्वामधल्या घडणाऱ्या प्रक्रियांमधील प्रेरणा बाहेरून लावल्या गेल्या नाहीत तर चंचळ विश्वाच्या आतच राहून सर्वांचे नियंत्रण करणारे एकच एक चित् तत्त्व आहे. म्हणून पूर्ण परब्रह्मस्वरुप पूर्णत्वानेच राहते हे सिद्‌ध होते.

## ओवी एकोणसावी

**चंचळपण चंचळी सरले । तरी ते निश्चळची उरले ।**
**नारायणी शांत केले । आधि-व्याधी सरताची ।।१९।।**

**अर्थ :-** चंचळ दृश्य असे जगत् जड आणि चेतन वस्तुंनी बनलेले आहे. प्राण्यात चैतन्य आहे तसेच ते जडात पण आहे असा निश्चय होणे म्हणजे चंचळपण चंचळी सरले जाणे होय. चंचळ-निश्चळाचा सारासारविवेक केला असता चंचळाचा त्याग होऊन निश्चळ अशा परब्रह्माची अखंड भेट होते. द्वैत संपते आणि केवळ अद्वैत उरते. नारायण म्हणजे भगवान गुरुलिंगजंगम निंबर्गीकर महाराज हे केवळ निश्चळ परब्रह्मस्वरुप आहेत. त्यांच्या भेटीने शारीरिक आणि मानसिक दुःखाचा विनाश होतो आणि अखंड शांतता व समाधान प्राप्त होते.

**विवरण :- १)** अभेद चैतन्यतत्त्वाच्या ठिकाणी भेद निर्माण झाला तो दृश्यामुळे होय. चिद्तत्त्वातील चंचळत्वामुळे दृश्य निर्माण झाले. त्यामुळेच दृश्य चंचळ भासते. चिद्तत्त्वातील चंचळत्वामुळे असंख्य गुण आणि असंख्य तत्त्वे निर्माण झाली. त्यामुळे भेदाचा अनुभव येऊ लागला. मूळ परब्रह्माच्या ठिकाणी भेद नाही. सर्व गुणांचे आणि सर्व तत्वांचे पर्यवसान अनुभवजन्य दृष्टीने पाहिल्यास ते मूळ परब्रह्मातच होणारे असते. "चंचळ आकृति वर्तुळ फिरे । पुनः होय स्थिरे निश्चळातू ।" या उक्तीप्रमाणे दृश्य आणि अदृश्य, चंचळधर्माने दिसणारे असले तरी पुनः शेवटी निश्चळ परब्रह्मातच स्थिर होणारे आहे.

**२)** जो पर्यंत द्वैताचा म्हणजेच भेदाचा भ्रम निवारण होत नाही तोपर्यंत चंचळ-निश्चळ असे वर्गिकरण करावे लागते. एकदा चंचळाचा निरास होऊन निश्चळ परब्रह्मस्वरुप गुरुलिंगजंगम महाराज दृष्टिस पडले की जीवाच्या ठिकाणी असणारे कामक्रोधादि विचार नाहिसे होतात. पुढे त्यांच्याच कृपेने सर्वप्रकारचे मानसिक दुःख, चिंता तसेच शारीरिक दुःख नाहिसे होते.



## ओवी विसावी

**आधि-व्याधी सरता साक्षी । निजी---स्वये लक्षी ।**
**वाच्यांश लक्ष्यांश अलक्षी । एकसरा ।।२०।।**

**अर्थः-** निश्चळ परब्रह्मस्थितीत वासना, विकार संपतात. त्यामुळे सर्वप्रकारच्या शारिरीक व मानसिक दुःखाचे निवारण होते. "तत् त्वम असि ।" या महावाक्यातील वाच्यांश व लक्ष्यांशाचा अलक्ष्य अशा परमात्म्याच्या दर्शनाने प्रत्यक्ष अनुभव येतो.

**विवरण :- १)** "तत् त्वम असि" या महावाक्यातील "तत्" पदाचा वाच्यांश "ईश्वर" आणि लक्ष्यांश "ब्रह्म" असा आहे. तसेच "त्वम" पदाचा वाच्यांश "जीव" आणि लक्ष्यांश "कूटस्थ चैतन्य" असा आहे. शब्द उच्चारताच जो त्याचा अर्थ कळतो तो त्या पदाचा वाच्यांश व त्या शब्दाच्या लक्षणावरून जो अर्थ घेतला जातो तो लक्ष्यांश होय. चैतन्य आणि ब्रह्माची एकरुपता आहे म्हणून जीव देखील ब्रह्मच आहे असा लक्ष्यांश घेतला जातो. साक्षात्काराच्या चढत्या श्रेणीत हा जीवच आत्मा आहे आणि हा आत्माच ब्रह्मस्वरुप आहे याचे ज्ञान होते.

**२)** साधन करुन चार देहाच्या निरसनानंतर जीव ब्रह्मरुप होतो. उपाधिभूत चार देहाचे निरसन म्हणजे चंचळाचे निरसन होय. जे जे चंचळ ते ते मिथ्या असून उपाधीनिरपेक्ष ब्रह्मच केवळ सत्य होय. निर्गुण अशा ब्रह्माशी अनन्यता साधली असता चंचळातील वाच्यांश व लक्ष्यांश निरर्थक होतात. जोपर्यंत ब्रह्म 'अलक्ष्य' असते तोपर्यंत वृत्तीच्या सहाय्याने त्याला 'लक्ष्य' बनविण्याचा प्रयत्न चालू असतो. परंतु निर्गुण आणि निश्चळ ब्रह्माशी अनन्यता साधली असता 'लक्ष्य-अलक्ष्य' हा भेद मावळतो. थोडक्यात म्हणजे निश्चळ ब्रह्मस्वरुपामध्ये पूर्वपक्ष म्हणजे 'चंचळ', त्याचा ठावच रहात नाही. चंचळाचे अस्तित्वच संपल्यामुळे त्यातून निर्माण होणारे सर्व प्रकारचे दुःख ही नाहिसे होते.

## ओवी एकविसावी

**जीवना जीवन मिळाले । तरी ते केवी होय निराळे ।**
**जरी ते परमार्थी अथिले । नारायण गुरुकृपे ।।२१।।**

**अर्थ :–** जीवन म्हणजे चैतन्य. चैतन्याशिवाय शरीरात जीवन असू शकत नाही. शरीरामध्ये जसे चैतन्य आहे तसेच ते बाहेरील विश्वामध्ये देखील पसरून आहे. शरीरामधील चैतन्याचा साक्षात्कार झाल्यानंतर तेच चैतन्य विश्वामध्ये पसरलेल्या चैतन्यात मिसळत राहते. यापुढील अवस्थेत बाहेरील जीवन व आतील जीवन वेगवेगळे रहात नाही. जीवनात जीवन मिसळल्यावर प्राप्त होणारा आनंद हा परमार्थातील श्रेष्ठ अनुभव आहे. 'सद्‌गुरु नारायण' म्हणजे गुरुलिंगजंगममहाराज यांच्या कृपेने या अनुभवाची संपन्नता अनुभवास येणे हे भाग्याचे लक्षण आहे.

**विवरण :– १)** सर्वसाधारणपणे मानवी जीवनाच्या प्रवृत्ति आणि प्रेरणा ह्या बहिर्मुख असतात. पाणी जसे नैसर्गिकरित्या उताराकडेच वाहते तसे सामान्यपणे मानवी जीवन हे अधोमुखी असते. अधोमुखी अवस्था असलेल्या जीवनातील अशुद्धता दूर करून ते उर्ध्वमुखी करणे म्हणजे परमार्थ होय. उर्ध्वमुखी जीवनाची ओढ चैतन्याकडे लागलेली असते. ज्याच्यामुळे जिवंतपणाची जाणीव होते, अनुभूति येते ते चैतन्य होय. माणसाच्या सर्व हालचाली व क्रिया ह्या देहामधील चैतन्याचे सळसळीमुळे आहेत. चैतन्यामुळे देह टवटवीत रहातो. देहामुळे चैतन्याचे ज्ञान होत नाही परंतु चैतन्यामुळे आपल्याला देहाचे व बाहेरील जगाचे ज्ञान होते. साधनेने जीवन जेंव्हा उर्ध्वगामी होते तेंव्हा चैतन्याचा साक्षात्कार होतो. आतील चैतन्य बाहेरील चैतन्यात अखंडितपणे मिसळत रहाते. आपल्यासह सारे विश्व म्हणजे चैतन्याचा महासागरच आहे अशी सतत प्रचीति येत रहाते.

**२)** परमात्मा चैतन्यरुप आहे. परमार्थात चैतन्याचा अनुभव घ्यायचा आहे. चैतन्याद्वारा चैतन्याचा अनुभव घेणे म्हणजे परमार्थ. चैतन्याच्याद्वारा चैतन्याशी तादात्म्य पावणे, अनुभूति घेणे म्हणजे परमार्थ. जीवनात जीवनाचे होणारे विचरण, जीवनात जीवन मिसळणे म्हणजे परमार्थ होय. पण हा खरा परमार्थ सर्वांनाच लाभतो असे नाही. कारण परमार्थ हा केवळ बुद्धीचा विषय नसून तो वाटचाल करण्याचा विषय आहे. परमार्थाचे गुह्यशास्त्र सद्‌गुरुकृपेवाचून उमगणार नाही. परमार्थाची सुरवातच सद्‌गुरुंच्या अनुग्रहाने, त्यांच्या कृपेने होते. साधनेने सद्‌गुरुकृपा किंवा कृपा झाली की साधन, ह्यापैकी कांहीही आधी होऊ शकते. एकदा सद्‌गुरुकृपा झाली की मग मात्र त्याच्या भाग्याला सीमा रहात नाही.

## ओवी बाविसावी

**––– होती । ते–––पूर्ण निश्चिती ।**
**जेथ का स्वसंवेद्य स्थिती । आकळिली ।।२२।।**

**अर्थ :–** आपणच आपणाला जाणणे म्हणजे स्वसंवेद्यता होय. परमार्थामध्ये 'स्वसंवेद्य' ही एक स्थिती आहे. हा स्थिती आकळली, तिचा अनुभव आला की आत्माच्या पूर्ण स्वरुपाचा निश्चय होतो. अशा निश्चयाने मिळणारे सुखही अमर्याद, शाश्वत, स्वसंवेद्य आणि निरपेक्ष असे असते.

**विवरण :– १)** देवदर्शन होणे म्हणजे आत्मज्ञान होणे होय. ज्ञान हा अनुभव असतो. माणसाला येणाऱ्या अनुभवामध्ये स्वरुपाचा अनुभव परमश्रेष्ठ असतो. 'स्वसंवेद्यता' म्हणजे स्वतःच स्वतःला जाणण्याची अवस्था होय. 'स्वसंवेद्य' असा परमेश्वर आहे. हा परमेश्वर म्हणजेच प्रत्येकाचा आत्मा होय. तोच परमात्मा आहे. आत्म्याहून परमात्मा भिन्न नाही. सर्व जगाला अधिष्ठानभूत असलेले चैतन्य म्हणजे परमात्मा आणि प्रत्येक देहाच्या ठिकाणी अधिष्ठानभूत असलेले चैतन्य म्हणजे आत्मा, वेगवेगळे नाहीत. त्यांच्यात भिन्नता नाही. आपण आपल्याला जाणणारा आत्मा आणि परमात्मा ज्ञानरुप असून तो ज्ञानरुप वृत्तीनेच जाणला जातो. तो

अविद्येतील ज्ञानाने जाणला जात नाही. 'स्वसंवेद्य' या पदाने केवलाद्वैत ब्रह्मसिद्धांतचेच प्रतिपादन केले जाते.

**२)** ज्ञानाच्या सिद्धतेसाठी प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द इत्यादी प्रमाण वापरले जाते. स्वसंवेद्य म्हणजे कोणत्याही प्रमाणाला विषय न होता प्रत्यक्षस्वरुप असणे होय. स्वसंवेद्य शब्दाने आत्म्याचे/देवाचे स्वरुपलक्षण सांगितले आहे. तो देव आत्मरुप आहे. सर्वभूतामध्ये आत्मरुपाने एकच देव आहे. आत्मरुप या शब्दाने जीवब्रह्म ऐक्य हा अद्वैताचा सिद्धांतच ध्वनित होतो. देहबुद्धीच्या ज्ञानव्यवहारात ज्ञाता हा ज्ञेयाहून नेहमी भिन्न असतो. परंतु आत्मज्ञानाच्या व्यवहारात ज्ञाता ज्ञेयाशी तद्रुप होऊन अभिन्नतेने ज्ञेयाचे स्वरुप जाणतो. देहबुद्धीतील ज्ञान हे मायेच्या कक्षेतील असल्याने ते अनिश्चित, अपूर्ण व संशयसहित असते तर आत्मज्ञान अविद्या मायेच्या पलीकडील असल्याने ते निश्चित संशयरहित असून संपूर्ण समाधान देणारे असते.

## ओवी तेविसावी

**न कळता जाले सुख । हेची नवल विशेख ।**
**––– हरिख । होवोनी ठेला ।।२३।।**

**अर्थ :–** जीवन स्वसंवेद्य आत्मरुप स्थितीमध्ये स्थिरावताच खऱ्या सुखाची प्राप्ति होते. येथे आनंदासाठी अन्य कोणत्याही उपायाची जरुरी नसते. आत्मज्ञानाचे विशेष लक्षण म्हणजे जीवाला केवळ सुखाची व आनंदाची प्राप्ति होते असे नाही तर तो जीव सुखरुपच होऊन राहतो. आपल्याला सुख झाले आहे अशी वेगळी जाणीवही त्याच्या ठायी शिल्लक रहात नाही.

**विवरण :– १)** जीव हा मूलतः सुखरुप आहे. परंतु तो शरीराच्या उपाधीत सापडला आहे. देहाची उपाधि आली की सुख दुःख अटळ होते. ज्यातून पुनः दुःख निर्माण होणार नाही असे अक्षय खरे सुख फक्त परमार्थातच मिळू शकते. बाह्य पदार्थांकडून चैतन्याकडे लक्ष लागले असता केवळ चैतन्याची जाणीव शिल्लक राहते. कल्पनेचा निरास झाल्याशिवाय चैतन्याकडे वृत्ति पूर्णपणे वळत नाही. त्या केवळ चैतन्याच्या जाणीवेत सुख आहे. चैतन्याकडे वृत्ति वळविणे हे निरपेक्ष साधन आहे. त्यामुळे त्यापासून मिळणारे सुख ही निरपेक्ष असते. असे मिळणारे सुख अखंड टिकविणे ह्यासाठी साधन आहे.

**२)** संसारातले सुख हे जाणीवेतले असून ते सापेक्ष व अहंकारपूर्वक मिळविलेले असते. परमार्थातले वैशिष्ट्य म्हणजे केवळ साधनकाळात सुद्धा सुख मिळवण्यास सुरुवात होते. साधनेमध्ये अहंकाराचा जाणीवपूर्वक त्याग होत असतो. आत्मज्ञानातील सुख हे त्रिपुटीरहित अवस्थेत मिळणारे सुख आहे. आत्मज्ञान म्हणजे सच्चिदानंदाचा होणारा सततचा साक्षात्कार होय. आत्मज्ञानामध्ये ज्ञाता वेगळा रहात नाही. उरते केवळ ज्ञानरुप/आत्मरुप अवस्था. सत् आणि चित् एकत्र आले की तेथे आनंद असलाच पाहिजे. आत्मज्ञानाचे विशेष लक्षण म्हणजे ज्ञानरुपतेबरोबरच जीव आपोआप सुखरुप होऊन जातो.

## ओवी चोविसावी

**अहंभाव जो शरीरी । सद्गुरु तो अंगीकारी ।**
**हस्त ठेवोनिया शिरी । कृपादृष्टी ।।२४।।**

**अर्थ :–** जेंव्हा शरणागतीची पराकाष्ठा होते तेंव्हा सद्गुरुंची कृपादृष्टी प्राप्त होते. शिष्याच्या मस्तकावर सद्गुरुंचा हात असणे हा कृपेचा उच्चतम आविष्कार असतो. त्यांच्या कृपेमुळेच शिष्याचा सूक्ष्म अहंकार काढून घेतला जातो. त्यामुळे त्याला आत्मबोधाच्या अवस्थेत स्थैर्य प्राप्त होते.

**विवरण :– १)** परमार्थाच्या शेवटच्या टप्प्यातील सर्वात सूक्ष्म अडथळा म्हणजे व्यक्तित्वाचा सूक्ष्म अहंकार होय. सर्वप्रकारच्या 'माझे' चे विसर्जन साधनेच्या प्रक्रियेने होत असते. परंतु 'माझे' चे विसर्जन करणारा सूक्ष्म 'मी' शिल्लक असतो. सद्गुरुनी त्याच्या सूक्ष्म अहंकाराचा अंगिकार केल्याशिवाय

केवळ स्वप्रयत्नानी तो जात नाही. अहंकार शिल्लक ठेवून संपूर्ण समर्पित होता येत नाही. जेथे अहंभाव आहे तेथे ब्रह्मभाव प्रकट होत नाही. सद्गुरु सामर्थ्यवान असून अत्यंत उदारपणे कृपा करून शरणागत जीवाच्या ठिकाणी दिव्य सामर्थ्याचा संचार करतात. त्यामुळे ब्रह्मभावाबरोबर ब्रह्मानंदाचा उद्भव त्याचे ठायी होतो.

**२)** सद्गुरु फार दयाळू असतात. गुरुकृपा ही अलौकिक असते. परंतु निष्ठेशिवाय गुरुकृपा नाही. ज्याप्रमाणे साधनाचा अभ्यास त्याप्रमाणात सद्गुरुकृपा होणार असते. शरणागत भावानेच अंर्तयामी श्रद्धा प्रकट होते, वाढते. गुरुकृपा हा प्रसाद आहे. त्यांची कृपा ही नेहमी पूर्णरुपातच असते. गुरु हे आत्मरुप म्हणजे चैतन्यरुप असतात. निखळ चैतन्य हे सद्गुरुंचे खरे स्वरुप आहे. चैतन्याची खेच सुरू होणे हा गुरुकृपेचा खरा अनुभव आहे.

## ओवी पंचविसावी

**ऐसे नवल महिमान । कृपे भरिले अंतःकरण ।**
**भगवान नारायण । दासरामी ।।२५।।**

**अर्थ :–** भगवान सद्गुरु नारायण म्हणजे गुरुलिंगजंगमांच्या दयादृष्टिमुळे अंतःकरण कृपेने भरुन गेल्याचा अनुभव श्रीदासरामांना येत आहे. सद्गुरुकृपा प्रसाद प्राप्त झाल्यामुळे अंतःकरणात दाटून आलेली कृतज्ञता श्रीदासराममहाराजानी अशाप्रकारे व्यक्त केली आहे.

**विवरण :– १)** भक्ताच्या कल्याणासाठी जी मंगलशक्ती अवतरली जाते तीच गुरुकृपादृष्टी होय. 'कृपा' ही सद्गुरुंची दिव्य शक्तीच असते. अंतःकरणात दिव्य शक्तीचा संचार झाल्याने त्याचे व्यापार दिव्य बनतात. व्यक्तित्व वेगळेपणाने पण निरहंकार जाणिवेने व दिव्यत्वाने भारुन जाते. या सर्वाचा परिणाम म्हणून त्रिगुणाचा पसारा लीन होतो. जड चेतन होते. दुःख आनंदरुप होते. सारे द्वंद्वच मिटते. अशा तऱ्हेने श्रीगुरुलिंगजंगमांच्या कृपेने सारे विश्वच अमृतरुपाने दिसत असल्याचा अनुभव श्रीदासराममहाराजांनी नमूद केला आहे.

**********



## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती दासरामा
निरंजन निजधामा
मायबाप दिनानाथा
कल्पवृक्ष पूर्णकामा ।।ध्रु।।

सद्गुरु हनुमंतराये
कृपादृष्टी लाभली
गोविंद भक्तिची
परिसीमा जाहली ।।१।।

सिद्धानंद रुपाने
नारायण प्रकटला
गुरुलिंग गीतेचा
अवतार जाहला ।।२।।

सद्गुरु रामराया
स्वामी सद्चिदानंदा
नित्य स्मरणी राहो
तव *पदारविन्दा* ।।३।।

**– नारायण देशपांडे**

# – आरती –

## श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्‌गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।४।।

– श्रीदासराममहाराज

***

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्‌गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्‌ध । धरुनि रूप सिद्‌धानंद ।।१।।
सिद्‌धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

*****

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र...............१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार........१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)...........१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५

११) सिद्धस्तुती.......................................................१९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.....................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र.............................. (सन नाही)

१५) गुरुपाठ..........................................................१९८४

१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत....................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र.............................१९८७

२०) नित्यपाठामृत......................................................१९८७

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२१) संजीवनपाठ......................................................१९८७

२२) श्रीदासरामवचनामृत..............................................१९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति.....................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन...................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण.....................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा......................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ.................................१९९७

३०) श्रीरामदासबोध....................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला................................१९९९

३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)....२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी.......................२००२

३४) आरती संग्रह.....................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन..................................................२००७

३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना...................................२०१०

३८)अनुभवामृत सम-ओवी-टीकेसह.....................................२०१०

३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.................................२०१०

४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |